।। श्री गणेशाय नमः ।।

# लेखकाचे मनोगत

ॐ श्री सिध्दीविनायकाय नमः । ॐ श्री सरस्वत्यै नमः । ॐ श्री गुरुभ्यो नमः ।

विश्ववंदनीय या सृष्टीचा प्राण हृदयाचा गारवा माझा श्रीराम, या मर्यादा पुरुषोत्तमाच्या चरणी कोटी–कोटी प्रणाम! तसेच माझ्या ललाटीची भाग्यरेखा माझे इष्टदैवत, माझा प्राणसखा, माझ्या अस्तित्वाची अखंड ज्ञानज्योत असलेले माझे श्री चैतन्य हनुमान प्रभू या देवताच्या चरणी भक्तीभावे लोटांगण घालतो.

भक्तीचा महासागर, श्रीरामाचा श्रेष्ठ भक्त, श्रीराम शक्तीपीठाची प्राणशक्ती, श्रीराम शक्तीपीठाचे मांगल्य, कोटी सूर्याच्या तेजाने प्रकटलेली ही सगुण–साकार मूर्ती जणू आपल्याकडे बघून बोलते, काही तरी हितगुज सांगतेय असे वाटते. असा सुसंवाद दर्शविणारी ही तेजोमय मूर्ती क्षणोक्षणी काही तरी सांगून जाते, काही तरी वदवून घेते जशी आई–बाळाला, गाय–वासराला नेहमीच वात्सल्याने निरासग प्रेम देण्याचे काम करते, तसे हे परिपूर्ण वात्सल्य म्हणजे माझे हनुमंतराया आहेत. या प्राणसख्याचे गुणगान गावे तेवढे कमीच आहेत. हनुमंतरायाकडे पाहिलं की असं वाटतं, पूर्ण विश्वातला प्रेमवात्सल्याचा, जिव्हाळ्याचा, ज्ञानाचा, भक्तीचा, दयाकरुणेचा, वैराग्याचा स्त्रोत अंतःकरणी प्रकटत आहे. आणि तो परमसुखाचा आनंद देण्याचे काम करत आहे. तो आनंद किती वर्णावा! शब्दच सुचत नाहीत. या दैवताने माझी भाग्यरेखाच बदलून टाकली आहे. माझ्यासारख्या वेड्याला काव्यलेखनाचे ज्ञान देवून एक मोठेपणा दिला आहे. काव्यज्ञानाची संहिता माहित नसतांना, कोणत्याही प्रकारचं वेदपठण, शास्त्रज्ञान किंवा काव्यज्ञान नसतांना माझ्याकडून, अंतःकरणाला परमसुख देणारे काव्य कसे करुन घेतले हे मलाच कळत नाही ! त्यातला मतीतार्थ मी जाणत नाही. शब्दशः अर्थ मी जाणू शकत नाही. तरीही वेड्यासारखा बडबड करत गेलो आणि भगवंताने ते स्विकारलं असं वाटतं. ही दैव शक्ती श्रीराम शक्तीपीठाचं कार्य करण्यासाठीच आली की काय ? या दैवशक्तीने माझ्या भाग्यामध्ये जे होतं नव्हतं ते सर्वच लिहून टाकलं असंच मला वाटतं.

माझ्या जीवनातलां सर्वात आनंदाचा क्षण, सर्वात सुखदायी, आत्मसुखाची प्रचिती देणारा, निजधामाची निर्मळ वाट दाखवून देणारा, अस्तित्वाची अखंड ज्योत तेवत ठेवणारा, ज्याच्या कृपेने माझा श्वास चालतो, तो देव अंजनीचा पूत्र, रामाचा श्रेष्ठ भक्त, माझ्या हनुमंतरायाचा एक दृष्टांत माझे पूर्ण जीवन बदलवून टाकणारा होता

आणि खरचं माझं जीवन बदललं. हनुमंतराया म्हणजे सगुण-साकार परब्रह्म, परमेश्वर, निर्गुण-निराकार सच्चिदानंद स्वरुप, ज्ञान गुणांचा असीम भंडार, भक्ताला हात धरुन मार्ग दाखवणारा हा चैतन्यदेव पावला. माझ्या वरती कृपा झाली आणि त्याकृपेने महान तेजस्वी, ज्ञान वैराग्याने परिपूर्ण, तत्वज्ञानी, दिव्यदृष्टी असा एक महापुरुष मला प्राप्त झाला.

अर्थातच माझे सद्‌गुरु, वंदनीय, पूजनीय, आदरणीय सद्‌गुरु, 'स्वामी सागरानंद' मला भेटले आणि माझं जीवन कृतकृत्य झालं. जीवनाला मांगल्याची दिशा प्राप्त झाली. जसा एक मूर्तीकार पाषाणाला घडवितो आणि बघता बघता ती मूर्ती अतिशय प्रिय होवून जाते. लोकांना हवी हवीशी वाटते. माझ्या जीवनामध्ये असेच घडले. स्वामीजींनी माझ्या मध्ये मानवतेचे परिपूर्ण अनमोल असे गुण टाकून भक्तीधर्म, दयाधर्म, साधूधर्म, ज्ञानधर्म, परोपकार धर्म, सर्व जीवनाचा सारासार, माझी पात्रता नसतांना हे गुण माझ्यामध्ये टाकले.

मला समाजामध्ये चालायला, बोलायला शिकविले, खरचं! जीवनामध्ये सद्‌गुरु आल्यानंतर जीवन किती बदलून जातं हे मी पुस्तकामध्ये, ग्रंथामध्ये वाचलं होतं पण ते माझ्या बाबतीत घडलं, की गुरु काय असतो? हे मला जाणवायला लागलं, सद्‌गुरुशिवाय मार्ग नाही. ज्ञानाची फोड नाही. जीवन जगण्याचा मार्ग सापडत नाही. कसं जीवन जगावं हे ही कळत नाही. प्रसंगांना कसं सामोरे जावं हे ही कळत नाही. जीवन जगत असतांना खरचं कोणीतरी हात धरणारा असावा, कोणीतरी वाट दाखवणारा असावा. तो म्हणजे आपल्या जीवनातलं अनमोल स्थान म्हणजे 'सद्‌गुरु.' सद्‌गुरु म्हणजे एक 'कल्पवृक्ष' महासागराची उपमा कमी पडेल, कोटी ज्ञानसूर्याची गणना केली जाणार नाही. जशी समुद्राची खोली पाहू शकत नाही, आकाशाची पोकळी मोजू शकत नाही, अशीच असीम कृपा, असीम लिला, ज्ञानभक्तीचे असंख्य घाट, खूप काही अनुभवयास मिळते आणि जीवन काय हे कळते. हे आपल्या लक्षात येतं आणि जीवन जगण्यासाठी वेगळाच आनंद प्राप्त होतो. हे सर्व काही मला माझ्या स्वामीजींनी अनमोल धन दिलं. या उपकारांची फेड तर मी कधीच करु शकत नाही. त्यांनी केलेलं सहाय्य, मला दिलेलं योगदान मी शब्दात लिहू शकत नाही. म्हणून मी ठरवलं की, मी माझ्या स्वामींजींसाठी काहीतरी आठवण म्हणून स्वामींजींच्या जीवनाबद्दल चार शब्द लिहावे. तसं काव्य पदाचं ज्ञान मला नाही. माझा सखोल अभ्यासही नाही. मला बरोबर मराठीही लिहीता येत नाही, वाचता येत नाही. शब्दाचा मतीतार्थ समजून येत नाही, तरी पण सद्‌गुरुची कृपा झाल्यावरती हे सर्व काही सहज झालं आणि माझ्याकडून स्वामीजींनी 'श्रीगुरु अमृतगाथा' लिहून घेतली. ती कशी आहे, काय आहे, मला माहित नाही पण मला एवढं जाणवलं की ते माझ्यासाठी व माझ्या श्रीराम

शक्तीपीठासाठी अनमोल असून प्रत्यक्षात एक अमृतच आहे. मी माझं परमभाग्य मानतो मला कोणत्याही प्रकारचं ज्ञान नसतांना या दयासागराने माझ्यावरती दया केली, छत्रछाया धरली. प्रत्येक शब्द लिहून घेतला शब्दसुमनांचा पाऊस पाडणारा दयाळू परमात्मा म्हणजे माझ्या ह्रदयाची ज्योत, माझे सद्‌गुरु स्वामी सागरानंदजींच्या चरणी कितीही ऋण व्यक्त करु तेवढे कमीच!

मला माझ्या वाचक बंधू भगींनींशी हितगुज करावेसे वाटते. वाचक बंधू, भगिनी हे माझ्यासाठी वंदनीय, पूजनीय आहेत. अंत:करण मोकळं करतांना खूप आनंद होत आहे व तेवढच समाधानही वाटत आहे. श्रीगुरु अमृतगाथा याचा मतीतार्थ माझ्या अल्पबुद्धी प्रमाणे सांगतो.

गुरु अज्ञानरूपी अंधार नष्ट करुन ज्ञानमय प्रकाशाकडे नेणारा हा अखंड स्त्रोत परमसुखाची प्राप्ती करुन देणारा, ज्ञानभक्तीची व मानवतेची जाणीव करुन देणारा या मृत्युलोकी पावन करणारा कल्याणकारी स्त्रोत होय. गाथा म्हणजे सद्‌गुरुने या मृत्युलोकी येवून जीव सृष्टी उध्दारण्याचे मंगलकार्य केलेलं प्रकटीकरण.

सद्‌गुरु हे मंगलकार्यासाठी, ज्ञानभक्तीचा बाग फुलवण्यासाठी येतात, भक्तांना सद्‌मार्ग दाखविण्यासाठी, धर्माचा जिर्णोध्दार करण्यासाठी, ज्ञानभक्तीचा मार्ग दाखविण्यासाठी, अज्ञानरुपी अंधार नष्ट करुन ज्ञानमय प्रकाश या सृष्टीला देण्यासाठी हे अवतारी पुरूष मांगल्याच रुप घेवून सगुण साकार होतात आणि साधारण माणसा सारखं आपलं जीवन व्यतीत करत असतात. आपल्यासारखं कार्य करतांना दिसतात पण ते वेगळेच असतात. वेगळेच म्हणजे काय? त्यांची गोडवाणी, नम्रता, लिनता, उदारता, ज्ञानवैराग्याने परीपूर्ण, दयाकरुणेची सगुणमूर्ती मांगल्याचं दर्शन घडवणारी अशी सदा निर्मळ वाहत राहणारी ही ज्ञानकरुणेची गंगा आपल्या सर्वसाधारण माणसांच्या लक्षात येत नाही.

म्हणून म्हणतात, 'पाण्यामध्ये मासा निद्रा घेतो कसा । जावा त्याच्या वंशा तेव्हा कळे ।।' या उक्तीप्रमाणे साधूसंतांच्या व गुरुवर्यांच्या या महापुरुषांच्या सान्निध्यात, सुसंगतीत, सेवेत गेल्यानंतरच हे महात्मे ईश्वराचे अंश, प्रत्यक्षात ईश्वरच या धरतीवरती कार्य करण्यासाठी आला आहे, असे आपल्याला अनुभवास मिळते.

सद्‌गुरु लवकर आपल्या लक्षात येणं एवढं सोप नाही, त्यासाठी गुरुभक्ती, गुरुप्रेम, श्रध्दा, विश्वास व गुरुने दिलेला महामंत्र प्रेमभावे, भक्तीभावे जपसाधना करावी लागते. तरचं ही विभूती आपल्या अनुभवास येते आणि एकदा अनुभवास आली की असं वाटते या सद्‌गुरु परमेश्वराच्या पलिकडे दुसरे ब्रह्मसत्य काहीच नाही. सद्‌गुरु हेच सत् चित्त् आनंद, परब्रह्म आहेत, म्हणून सर्व माझ्या वाचक बंधू भगिनींना विनंती

**।। श्रीगुरु अमृतगाथा ।।**

श्रीगुरु अमृतगाथ्याच पारायण, चिंतन, पठण, मनन करावे. तुम्हाला भक्तीची आवड निर्माण होईल आणि जीवन सुखमय होईल.

श्रीगुरु अमृतगाथाही ओवीबद्ध केली आहे. अगदी साध्या, सोप्या भाषेत सर्वांच्या लक्षात येईल. ओव्यांच्या माध्यमातून मला सद्‌गुरु बद्दल काय म्हणावयाचे आहे हे लक्षात येईल. मला असे वाटते की, ओव्यांच्या माध्यमातून मी हे गुरु स्तोत्र गाईले आहे, म्हणून प्रत्येकाने आपल्या सद्‌गुरु प्रति भक्ती, प्रेम, नम्रता, आदर, विश्वास ठेवला पाहीजे आणि तोच भाव मी या गुरुगाथे मध्ये टाकला आहे असे मला वाटते.

तो माझा निर्मळ भाव गुरुगाथा श्रवण, पठण केल्यानंतर सर्वांच्या लक्षात येईल. माझ्यासाठी हा एक चमत्कार आहे शब्द कसे सुचत गेले आणि मी ते बोलत गेलो ही सद्‌गुरुकृपाच म्हणावी कारण असं वाटायचं की हनुमंतराया आणि माझे स्वामीजी माझ्यावरती शब्द सुमनांचा पाऊस पाडत होते, मी ते टिपत होतो आणि त्याच्यातून ही गुरुगाथा निर्माण झाली.

श्रीगुरु अमृतगाथा लिहितांना मला असे अनमोल साधक लाभले ते साधक म्हणजे या श्रीराम शक्तीपीठाला तन,मन,धन अर्पण करुन समर्पणाची भावना अंतरी ठेवून उत्कृष्ट कार्य करणारे, श्रीराम शक्तीपीठाला एक साधू म्हणून आत्मसर्पण करणारे गुरुभक्त, गुरुनिष्ठावान, गुरू सेवेत नेहमी तत्पर, गुरू आदेशाचे पालन करणारे व गुरूच सर्वस्व आहे असे मानून जीवन व्यतीत करणारे हे साधक चि.आदित्य जाधव, श्री सिध्देश्वरानंद सरस्वती, श्री सुदर्शनानन्द सरस्वती, श्री विश्वेश्वरानंद सरस्वती हे साधू तत्वाला परिपूर्ण शोभतील असे ग्रहमालेतील ग्रहच म्हणावे की काय? असं मला वाटतं यांना कोणती उपमा देऊ शब्द कमी पडतील या साधकांनी एक शिष्य तत्व निभवतांना सावधानता, तत्परता निभवून लिखाणाचे काम केले, माझ्यासाठी हा खूप मोठा चमत्कार आहे. कसं सुचत गेलं ? मी बोलत गेलो आणि हे साधक राजहंस मोती टिपतो तसे शब्द टिपत गेले, श्रीगुरू अमृतगाथेला एक चैतन्य निर्माण होत गेलं. खरचं सांगावसं वाटतं मी असा खूप गाढा अभ्यासक नाही, काव्याची संहिता माहित नसतांना ह्या सगळ्या गोष्टी भगवंताने माझ्याकडून करुन घेतल्या हिच भगवंताची कृपा, हेच भगवंताचे दर्शन, हा भगवंताचा दृष्टांत, हिच भगवंताची लिला, हिच अद्‌भूत शक्ती मला पावत गेली आणि हे शब्द माझ्याकडून आपोआप स्फुरण होऊ लागले, माझी वाणी या अमृतगाथेने पावन झाली हा परमेश्वर सर्व करून घेतो आपण सर्व निमित्त मात्र आहोत. देव दयाळू आहे त्याला भोळी भक्ती आवडते आणि तो भक्ताला मोठेपणा देवून असे मंगलकार्य करून घेतो. मी आठ-नऊ वर्षाचा असतांना माझ्या आईने मला मंत्रदिक्षा देवून पावन केले, त्या

गुरुमंत्राने मला भगवंताची आवड निर्माण झाली. मला रामनामाचं आणि साधू संतांचं एवढं वेड लागलं की घरदार, आईवडिल आणि माझी शाळा मी कशी सोडून दिली माझ्या लक्षातचं आलं नाही, गुरू काय असतो ? शिष्य काय असतो ? गुरुदिक्षा काय असते ? हे मला काहिच माहित नव्हतं, पण परमेश्वराने मला सद्‌बुद्धी दिली आणि आईने दिलेल्या मंत्रावर माझा विश्वास बसला, त्या विश्वासाने मला साधूसंतांच्या मेळ्यात आणून चांगलं स्थान दिलं. मला माझ्या स्वामीजींची भेट घालून दिली, खरंच माझ्या जीवनाला चांगली दिशा मिळाली आणि माझं जीवन धन्य–धन्य झालं असं मला वाटतं.

या गुरु गाथेमध्ये अवतारी महापुरुषांचा सृष्टीवरती होणारा परिणाम, सृष्टीला तारुन नेणारी अद्‌भूत शक्ती भक्तीसाठी अनंत रुप धारण करणारी अद्‌भूत किमया, सृष्टीचा भार वाहण्यासाठी ईश्वराचा अवतार आणि या सृष्टीचा आयोजन नियोजन करणारा भगवंतानी रचलेला मूळ पाया याचं वर्णन या गुरुगाथेमध्ये पाहवयास मिळते.

शिष्य कसा असला पाहिजे ? त्याची भक्ती कशी असली पाहिजे ? भाव कसा असला पाहिजे ? आपल्या गुरुदेवांना आपल्या अंत:करणामध्ये कसं स्थान दिलं पाहिजे ? हे या गाथेत पहायला व बघायला मिळते, मी माझ्या पदरचं काहीच त्याच्यात टाकलेलं नाही, तसा मी ज्ञानी किंवा पंडीत नाही, सद्‌गुरुचे सहकार्य आणि सद्‌गुरुचा या सृष्टीवर असणारा मानवातील परोपकार धर्म मी मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सद्‌गुरुचरणी ही श्रीगुरु अमृतगाथा अर्पण करतांना खूप आनंद होत आहे. ही गाथा कृपासिंधू कैवल्यदाता सद्‌गुरु प्रभूंनी स्विकार करावी हीच अंत:करणा पासून सदिच्छा व्यक्त करतो.

तसेच ग्रंथाच्या छपाईसाठी नाशिकचे ‘आकृती आर्टस्’ यांचे मोलाचे सहकार्य लाभले, त्याबद्दल त्यांनाही धन्यवाद देतो व त्यांचाही आभारी आहे. त्यांना श्रीरामप्रभू, हनुमंतराय आशीर्वाद देतीलच देतील पण मी अंत:करणापासून त्यांचे ऋण व्यक्त करतो आणि सर्व धर्मधन भाग्यवंतांना विनंती करतो की हा ग्रंथ जरुर वाचावा, संग्रहीत ठेवावा, काही चुका असतील तर आम्हाला कळवावे आम्ही जरुर त्याचा स्विकार करु व दुरुस्ती करण्याचा प्रयत्न करु.

हा ग्रंथ सद्‌गुरुचरणी अर्पण !

**हनुमंतदास**
श्री श्री १००८ महामण्डलेश्वर
स्वामी सोमेश्वरानन्द सरस्वतीजी महाराज